साधकांचे मासिक प्रेरणा पत्र

# विपश्यना

साधक (मराठी)

बुद्धवर्ष 2566, आषाढ पौर्णिमा, 13 जुलै, २०२२ वर्ष 6 अंक ४

वार्षिक शुल्क रु. 100/- मात्र (भारताबाहेर पाठविण्यासाठी US $ 50)

वेगवेगळ्या भाषेतील पत्रिकांसाठी पाहाः http://www.vridhamma.org/Newsletter_Home.aspx

**धम्मवाणी**

**को नु हासो किमानन्दो, निच्चं पज्जलिते सति।**
**अन्धकारेन ओनद्धा, पदीपं न गवेसथ॥**

—धम्मपदपालि 146, जरावग्गो.

– जिथे प्रतिक्षण (सर्व काही) जळतच आहे, तिथे कसले हसणे? कसला आनंद? (कसला आमोद? कसला प्रमोद?) हे (अविद्यारूपी) अंधकाराने वेढलेल्या (भोळ्या लोकांनो!) तुम्ही (ज्ञानरूपी) प्रकाश-प्रदीपाचा शोध का नाही करीत आहात?

## पूज्य गुरुजींद्वारे परिवाराला लिहिलेली धर्म-पत्रे

पूज्य गुरुजींनी या धर्म-पत्रांमध्ये संबोधन तर परिवाराला केले आहे परंतु लिहिले आहे सर्व साधकांच्या लाभार्थ. त्यामुळे यांना इथे सामिल करताना मन प्रसन्न होत आहे. वाराणसीच्या ज्या शिबिरामध्ये गुरुजी 'धर्मधातुचे जागरण' आणि धर्माच्या पुनरुत्थानाची जी गोष्ट सांगत आहेत त्याच वाराणसीच्या मृगदाय वनात 2500 वर्षांपूर्वी आषाढ़ पौर्णिमेच्या दिवशी भगवान बुद्धांनी आपला पहिला धर्मोपदेश दिला होता, म्हणजेच, धम्मचक्कपवत्तन केले होते. इथेच 60 भिक्षूंचा पहिला भिक्षुसंघ बनला होता आणि इथूनच 'चरथभिक्खवे चारिकं बहुजन हिताय बहुजन सुखाय...' चा उद्घोष झाला होता. तेव्हा द्वितीय बुद्धशासनाच्या वेळी तिथून धर्माचे पुनरुत्थान होणे महत्त्वपूर्ण विषय आहे. म्हणूनच आज आषाढ़ पौर्णिमेच्या प्रसंगी या पत्राचे/लेखाचे विशेष महत्त्व आहे.

– (संपादक)

------------

## वाराणसी शिबिर : धर्माच्या पुनरुत्थानाचे प्रतीक

ठिकाण: बाराचकिया

9 सप्टेंबर, 1970

प्रिय शंकर-सीता, राधे-विमला, गिरधारी-मंजु,

सप्रेम मंगल कामना!

वाराणसीचे शिबिर आयोजित करून जे असीम पुण्य अर्जित केले त्यामध्ये तुम्हा सर्वांना, पूज्य माता आणि पिताश्रींना, तसेच परिवारातील इतर सर्व सदस्यांना भागीदार बनवून मन अत्यंत प्रसन्न झाले आहे. साधुकाराद्वारे पुण्यानुमोदन करून धर्म-लाभी बना.

या शिबिराची विशेषता ही होती की हे बनारस सारख्या तीर्थ स्थाना वर लागले जो की मिथ्यादृष्टीचा गड आहे आणि गंगा नदीच्या तटा वर लागले की जिथे दिवस-रात्र अंधविश्वासाचा घनदाट अंधकारच पसरलेला असतो. प्रज्ञा आणि ज्ञानाचा प्रकाश मिथ्या मान्यतांच्या गडद ढगांच्या मागे लपलेला असतो. अशा स्थानावर धर्म-धातुचे जागरण आपल्या स्वत:मध्येच एक महत्वाची गोष्ट आहे. मी याला धर्माच्या पुनरुत्थानाचे प्रतीकच मानत आहे. डालमिया कोठीच्या व्हरांड्यात उभे राहून जेव्हा कधी मी खाली घाटाच्या पायऱ्यांवरून शेकडो स्त्री-पुरुषांना भावावेशाने अंधभूत होऊन गंगेमध्ये डुबक्या मारताना पाहत होतो तेव्हा माझे मन त्यांच्या प्रति करुणा भावानेच भरत होते. खरेच यांना धर्माचे ज्ञान असते, यांची प्रज्ञा जागृत असती तर अशा मिथ्या मान्यतांमध्ये आपला वेळ नष्ट करत बसले नसते आणि चित्त विशुद्धीसाठी या नदीच्या जलाचा सहारा घेणे सोडून काही इतर अभ्यास केला असता की जो चित्ताशी संबंध ठेवणारा आहे.

लोकांमध्ये आजपासूनच नाही तर हजारो वर्षांपासून कसला अंधकार पसरला आहे की गंगेच्या जलामध्ये पाप नष्ट करण्याची ताकद आहे. कोणत्याही जलाने शरीरावरचा मळ निघून जाईल, ही गोष्ट तर लक्षात येऊ शकते आणि तो ही निघेल जेव्हा की पाणी स्वच्छ असेल, साफ असेल. जर नदीचे जल अस्वच्छ असेल तर शरीराला साफ करण्याऐवजी अस्वच्छच करेल. परंतु हे मानणे तर नितांत वेडेपणा आहे की त्या जलात पाप धुवण्याची शक्ती आहे. पापे कुठे लागलेली असतात, काय पापे शरीरावर चिटकून राहिलेली असतात, जर असे झाले असते तर नदीच्या पाण्याने शरीरावर लागलेल्या त्या पापांना स्पर्श केला असता आणि कदाचित धुतलेही असते. परंतु पापाचा संबंध तर आपल्या चित्ताशी आहे. सर्व पाप-पुण्य चित्तापासून उत्पन्न होतात आणि गंगेचे जल त्या अभौतिक चित्ताला कसे स्पर्श करू शकेल, कसे त्याचे पाप धुऊ शकेल. परंतु जेव्हा माणूस एखाद्या अंध मान्यतेच्या भावावेशात बुडून जातो तेव्हा त्याच्या विवेकाच्या डोळ्यांवर पट्टी

बांधलेली असते, त्याचे ज्ञान आणि त्याची प्रज्ञा लुप्त झालेली असते. तिथे कोणत्या तर्क-बुद्धीचा, न्याय-बुद्धीचा अथवा धर्मबुद्धीचा प्रवेश होऊ शकत नाही. कोणती गोष्ट सुसंगत आहे अथवा विसंगत आहे, याचे सत्यासत्य विवेचन होऊच शकत नाही.

खरा धर्म आपल्याला प्रत्येक प्रकारच्या अंधविश्वासापासून दूर करतो आणि आपली प्रज्ञा जागृत करतो, ज्यामुळे आपण शाई आणि सफेदीमधील फरक जाणू शकतो, खरे आणि खोटे यातील अंतर ओळखू शकतो. जिथे खरा धर्म आहे, तिथे अंधविश्वासही टिकू शकत नाही आणि अंधश्रद्धाही थांबू शकत नाही. धर्म मार्गासाठी श्रद्धा नितांत आवश्यक आहे, श्रद्धे शिवाय मार्गावर एक पाऊलही पुढे उचलले जाऊ शकत नाही. श्रद्धेविना साधक लंगड़ा होतो. श्रद्धाच साधकाचे सबल चरण आहेत. जरी प्रज्ञा असेल, ज्ञान असेल परंतु श्रद्धेचे नामोनिशाण नसेल तर साधकाची दशा त्या यात्रीसारखी आहे ज्याचे डोळे तर उघडे आहेत पण दोन्ही पाय कापलेले आहेत, म्हणून चालू शकत नाही. परंतु हीच श्रद्धा जेव्हा अंधश्रद्धेचे रूप धारण करते तेव्हा विवेक आणि ज्ञान समाप्त होऊन जातात. असा यात्री पायाने चालू शकण्यामध्ये तर खूप सबळ आणि पुष्ट असतो, परंतु डोळ्यांनी अंध असतो, म्हणून योग्य मार्गावर चालू शकत नाही. राजपथ सोडून कोणत्या तरी अंध गल्ल्यांमध्ये भटकू लागतो. या करीता कल्याण याच गोष्टीमध्ये आहे की साधकाजवळ श्रद्धा रूपी चरणही असावेत आणि त्याचबरोबर प्रज्ञा आणि विवेक रूपी नेत्रही. या दोन्हीच्या मिलापानेच साधक रस्ता न भटकता सहजतेने राजपथावर चालत चालत, लवकरच गंतव्य लक्ष्यावर जाऊन पोहोचतो.

भगवानांनी आपल्या सफलतेसाठी पाच बलस्थाने सांगितली आहेत—श्रद्धा, वीर्य, स्मृती, समाधि आणि प्रज्ञा. यामध्ये आपण पाहतो की श्रद्धा आधार शिला आहे, जणू आपले चरण आहेत, ज्यावर साधनेचे सर्व शरीर उभे आहे आणि प्रज्ञा आपले मस्तक आहे, आपले डोळे आहेत जे आपल्या चरणांना योग्य मार्गावर चालण्याचा निर्देश करतात. या दोन्हींचा संयोग मणि-कांचन संयोग आहे आणि अत्यंत कल्याणकारी आहे.

धर्म दानाच्या पुण्यबळाच्या प्रभावाने सद्धर्माप्रति सर्वांची श्रद्धा बलवती होवो आणि निर्वाणाप्रति प्रज्ञा जागृत होवो, हीच मंगल कामना आहे.

साशिष, स.ना. गो.

------------

## चित्त एक जनरेटिंग सेट

ठिकाण: बाराचकिया/मुंबई

दिनांक: 15 सप्टेंबर 1970

प्रिय शंकर-सीता, राधे-विमला, गिरधारी-मंजु,

सप्रेम आशीष!

बाराचकियाच्या दुसऱ्या शिबिराचे समापन करताना या महापुण्यामध्ये तुम्हा सर्वांसहित माता आणि पिताश्रींसहित परिवारातील सर्व सदस्यांना भागीदार बनविताना मन अत्यंत सुख संतोषाने भरून गेले होते.

भगवान बुद्धांच्या त्या विचरण भूमीमध्ये त्या अशिक्षित महिलांमध्ये जी धर्म-प्रज्ञा जागली, तिला पाहून मनातून हेच वाटले की या सर्वच्या सर्व जणींनी कोणत्या तरी पूर्व जन्मात भगवान बुद्धांच्या या पावन भूमीवरच धर्म लाभ प्राप्त केला आहे. म्हणूनच त्यांनी या द्वितीय शासनामध्ये सद्धर्माच्या संपर्कात येताच इतकी द्रुत गामिनी प्रगती केली आहे तसेच त्या सद्धर्माप्रति असीम श्रद्धामंडित झाल्या आहेत. हे त्यांच्या अपूर्व पारमीचेच तर लक्षण आहे.

या शिबिराची सर्वश्रेष्ठ साधिका तर मोहिनी माता होतीच, अजून एक चांगली साधिका कन्या नर्मदाच्या रूपात प्राप्त झाली.

इथे शिबिराचा धर्म बोध अशा प्रकारे जागृत झाला जणू आपल्या सर्वांच्या आत आपले चित्त एका जनरेटिंग सेट प्रमाणे सामावलेले आहे, जे की प्रतिक्षण काही ना काही चांगले किंवा वाईट जनरेट करतच राहते. या जनरेटरचा आपण हवा तर चांगलाही उपयोग करु शकतो आणि हवा तर वाईटही. वाईट उपयोगच अधिक होतो आणि चांगला खूप कमी. या जनरेटरची ही खूबी आहे की आपल्या आतमध्ये तर चांगल्या किंवा वाईट कर्मांना जनरेट करताना सुखाच्या किंवा दु:खाच्या लहरी निर्माण करतच असतो, प्रत्युत या जनरेटरचा प्रभाव आसपासच्या, शेजार-पाजारच्या त्या सर्व लोकांवरही पडल्याशिवाय राहात नाही, की ज्यांच्याशी आपला संपर्क होत असतो. ज्या वेळी आपले चित्त कोणत्याही दूषित वृत्तीला जनरेट करत असते, त्या वेळी केवळ आपल्या स्वत:चे शरीरच अवांछनीय कष्टप्रद परमाणुंच्या परिपुंजात परिवर्तित होत नाही, तर त्याच बरोबर जे कोणी आपल्या जवळ असतात, त्यांच्या नाम-रूप स्कंधामध्येही अशाच दूषित परमाणुंचे उत्पादन होत राहते. म्हणजेच जेव्हा आपण आपल्या चित्तात काम-वासनेच्या वृत्ती जनरेट करतो तेव्हा आपल्या शरीराचे अणु-अणु दूषित काम-वासनेने राग रंजित होऊन जातात आणि आपल्या समीपवर्ती लोकांच्या मनावरही त्याच गोष्टींचा प्रभाव पडतो. याच प्रकारे जेव्हा आपण क्रोधाच्या वृत्तींना जनरेट करतो तेव्हा सारे शरीर आग बंबाळ होऊन जाते आणि याचा प्रभाव शेजाऱ्यांवरही पडतो. जसे विचार आपल्या मनात उत्पन्न होतात तसे शेजाऱ्याच्या मनातही उत्पन्न होऊ लागतात. जी अवस्था वाईट चित्त वृत्तींची आहे, तीच अवस्था चांगल्या चित्त वृत्तींचीही आहे. जेव्हा ही आपण कुशल चित्त वृत्ती जनरेट करु लागतो, तेव्हा आपले सारे शरीर सुखद लहरींनी आप्लावित होऊन जाते आणि शेजाऱ्यांनाही आप्लावित करते. त्याच प्रमाणे जसे सुगंधित अत्तर बनविणारा व्यक्ती स्वत: ही अत्तराच्या सुगंधाने दरवळत राहतो आणि शेजाऱ्यालाही सुगंधित करीत राहतो. याच प्रकारे दुर्गंधाने भरलेला मळ उत्पन्न करणारा व्यक्ती स्वत:ही दुर्गंधाने पीडीत राहतो आणि जवळपासच्या लोकांनाही पीडीत करण्याचे कारण बनतो. अशा प्रकारे मैत्री भावनेला जनरेट करणारा व्यक्ती आपल्या चारही बाजूंना मैत्रीचा प्रभावच पसरवतो. इतरांमध्येही मैत्रीचे भावच जागृत करतो आणि हळू-हळू अजातशत्रुसारखा बदलून जातो. याच प्रकारे प्रतिक्षण द्वेष आणि हिंसा जनरेट करणारा व्यक्ती ना केवळ स्वत: हिंसेने परितप्त होतो तर इतरांच्या मनातही द्वेष, वैमनस्य आणि प्रतिहिंसाच जागृत करतो. साधारणपणे जेव्हा आपल्या मनात कोणाविषयी प्रेम वाढत जाते तेव्हा हळू-हळू समोरील व्यक्तीच्या मनातही आपल्याविषयी प्रेमच झळकू लागते. याच प्रकारे जेव्हा आपल्या मनात कोणाविषयी घृणा, द्वेष किंवा संशयाचे भाव

जागतात तेव्हा त्याच्या मनातही आपल्याविषयी ठीक हेच भाव जागू लागतात. हा साधारण मानव प्रकृतीचा सामान्य नियम आहे. परंतु याचे काही अपवादही असतात. दुष्टतेच्या पराकाष्ठेवर पोहोचलेला व्यक्ती कोणाच्याही मैत्री भावनेने प्रभावित होऊ शकत नाही. जसे की बुद्धांसारख्या महापुरुषाची मैत्री भावनाही देवदत्तला जीवन भर प्रभावित करु शकली नाही. तरी देखील जीवनाच्या अंतिम क्षणांमध्ये थोडीफार सुधारणा झाली. अशा प्रकारे कोणाची द्वेष भावना कोणा संत पुरुषाच्या हृदयात द्वेष भाव जागृत करण्यामध्ये असमर्थ होते. परंतु हे अपवाद आहेत. सामान्य मनुष्य एक दुसऱ्याच्या मैत्री आणि द्वेषाने प्रभावित झाल्याशिवाय राहात नाहीत.

अशा अवस्थेत हे अपेक्षित आहे की आपण प्रतिक्षण आपल्या आतमध्ये मैत्री भावच जनरेट करणे शिकले पाहिजे, की ज्यामुळे आपले तर मंगल होईलच, आणि आपल्याबरोबर इतरही अनेकांचे मंगल होईल. आपण चुकूनही कोणाविषयी द्वेष भाव जनरेट होऊ देऊ नये. जर आपण द्वेष भाव जनरेट केला तर आपले तर नुकसान करूच, इतरांनाही पथभ्रष्ट करण्यात दोषी होऊ. आपल्या मनाचा द्वेष भाव निश्चितच आपल्या प्रियहून प्रिय स्वजनांना आपले दुश्मन बनवेल आणि आपल्याच मनाचा सत्य मैत्री भाव आपल्या मोठ्यातल्या मोठ्या शत्रूला मित्रामध्ये परिणत करेल. धर्माचा हाच मंगलकारी प्रभाव आहे. आपल्याला याचा सर्वाधिक लाभ घेतला पाहिजे. हाच या शिबिराचा धर्म संदेश आहे.

साशिष,

सत्य नारायण गोयन्का.

--------------------

### नये उत्तरदायित्व
### वरिष्ठ सहायक आचार्य

1. श्रीमती आशा सूद, जळगाव
2. **China:** Mrs. Li Bin LB2
3. Mr. Zengguang Ma ZGM
4. Miss Hui Liu HL
5. Mr. Xiao Liu XL
6. Ms. Kunrong Pang KRP1
7. Mr. Huijun Sun HJS
8. Ms. Steffi Yan Zhang YZ
9. **Taiwan:** Mr. Arthur Chen AC2
10. Ms. Chao Yu Lai CL
11. Mr. Vincent Yu-cheng Pai VP7
12. Mr. Chien Te Wu CTW
13. Mr. Chung-Ming Yang CMY

### नव नियुक्तियां
### सहायक आचार्य

1. श्रीमती सविता हे. चौव्हाण, नागपुर
2. श्री धर्मरत्न जे. दामोदर, अकोला
3. श्रीमती अलका ए. शाह, भावनगर (गुज.)

### बालशिविर शिक्षक

1. श्रीमती उषा गुप्ता, अलवर
2. Ms Veronika Kovesdi, Hungary, Europe

## ऑनलाइन भावी शिबिर कार्यक्रम व आवेदन

सर्व भावी शिबिरांची माहिती नेटवर खालील लिंक्स वर उपलब्ध आहे. सर्व प्रकारचे बुकिंग केवळ ऑनलाईन होत आहे. म्हणून आपल्याला निवेदन आहे की खालील लिंक वर चेक करा आणि आपल्याला उपयुक्त शिबिरासाठी अथवा सेवेसाठी सरळ ऑनलाईनच आवेदन करा.

सर्व भावी शिबिरांची माहिती नेटवर खालील लिंक वर उपलब्ध आहे. सर्व प्रकारचे बुकिंग केवळ ऑनलाईन होत आहे. म्हणून आपल्याला निवेदन आहे की खालील लिंक वर चेक करा आणि आपल्याला उपयुक्त शिबिरासाठी अथवा सेवेसाठी सरळ ऑनलाईनच आवेदन करा.

HTTPS://WWW.DHAMMA.ORG/EN/SCHEDULES/SCHGIRI

विश्वभरातिल सर्व भावी शिबिरांची माहिती व आवेदना साठी:

HTTPS://SCHEDULE.VRIDHAMMA.ORG एवं WWW.DHAMMA.ORG

व खालील लिंक पहावी

https://www.dhamma.org/en-US/locations/directory#IN

## विपश्यना पत्रिकेसंबंधी आवश्यक सूचना

येणाऱ्या जुलै महिन्यामध्ये पत्रिकेचे ५२ वे वर्ष सुरु होत आहे. मागील जवळपास दोन वर्षांपासून पत्रिकेचे प्रकाशन केवळ ऑनलाईनच चालू होते. आता जुलै महिन्यापासून पत्रिका छापणे पुन्हा सुरु होत आहे. परंतु पेपर इत्यादी सर्व गोष्टींचे खर्च इतके वाढले आहेत की दुपटीहून अधिक खर्च येत आहे. त्यामुळे खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहेत.

१. पत्रिका आता आठ पृष्ठांची न होता, मुख्य लेख आणि विभिन्न सूचनांसहित केवळ चार पृष्ठांमध्ये छापली जाईल. प्रत्येक तिसऱ्या महिन्यात (त्रैमासिक) मुख्य लेखा सोबत कार्यक्रम इत्यादी आठ पृष्ठांमध्ये छापले जातील.

२. अशा प्रकारे वर्षातून दोन वेळा भावी शिबिर कार्यक्रम छापले जातील आणि राहीलेल्या दोन अंकांमध्ये सामूहिक साधना, एक दिवसीय शिबिरे तसेच प्रकाशना-संबंधी अन्य सूचना छापल्या जातील.

३. कृपया साधकांनी या पत्रिका आपल्याकडे सांभाळून ठेवाव्यात जेणेकरून वर्षभर त्या कामी येतील आणि दुसऱ्यांदा कोणाला विचारण्याची आवश्यकता भासणार नाही. अधिक माहितीसाठी खाली दिलेल्या 'ऑनलाईन भावी शिबिर कार्यक्रम एवं आवेदन' ची लिंक पहावी.

४. पत्रिकेचे वार्षिक शुल्क रु. ३०/- वरून वाढवून रु. १००/- केले जात आहे. नवीन आजीवन सदस्य घेतले जाणार नाही. पण पहिल्यापासून जे आजीवन सदस्य आहेत त्यांची पत्रिका चालू राहील.

५. ऑनलाईन सर्व अंक पूर्ववत उपलब्ध होतील. (वरील क्रमानुसारच)

६. ऑनलाईन शिबिरांचे बुकींग चालूच राहील. त्याकरीता पत्रिकेच्या प्रत्येक अंकात सूचना छापल्या जात आहेत. कृपया लक्षपूर्वक वाचून त्यांचा उपयोग करावा.

## विपश्यना विशोधन विन्यास

विपश्यना विशोधन विन्यास( Vipassana Research Institute- VRI) एक अशी संस्था आहे जी साधकांसाठी धर्मसंबंधी प्रेरणादायक पाठ्य सामग्री योग्य किमतीत उपलब्ध करते. येथील सगळे साहित्य कमीत कमी किमतीत उपलब्ध आहे ज्यामुळे अधिकाधिक साधक याचा व्यावहारिक लाभ घेऊ शकतील. विपश्यना साधनेसंबंधी अमूल्य साहित्याचा हिंदी, इंग्रजी तसेच अन्य भाषांमध्ये अनुवाद तसेच संशोधन करावयाचे आहे. यासाठी विद्वानांची आवश्यकता आहे. शोधकार्य मुंबईतील या ठिकाणी होईल– **'विपश्यना विशोधन विन्यास'**, परियत्ति भवन, विश्व विपश्यना पगोडा परिसर, एस्सेल वर्ल्ड जवळ, गोराई गाव, बोरीवली पश्चिम, मुंबई- 400 091, महाराष्ट्र, भारत. फोनः कार्या. +9122 50427560,

मो. (Whats App) +91 9619234126.

या शिवाय VRI हिंदी, इंग्रजी व मराठी मासिक पत्रिकांच्या माध्यमातून पूज्य गुरुजी द्वारा झालेले पत्र व्यवहार, जुने ज्ञानवर्धक लेख, दोहे, मुलाखती, प्रश्नोत्तर इत्यादीं प्रेरणाजनक माहिती प्रकाशित करते, ज्याने साधकांची धर्म पथावर उत्तरोत्तर प्रगती होत रहावी.

या सर्व कार्याला सुरू ठेवण्यासाठी साधकांचा सहयोग अत्यंत आवश्यक आहे. भविष्यात अनेक साधकांच्या लाभासाठी धर्माच्या वाणीचे प्रकाशन अनवरत चालू रहावे, यासाठी सहयोग देण्यास इच्छुक असणाऱ्या साधकांनी खालील पत्त्यावर संपर्क करावा. या संस्थेला दान देणाऱ्यांसाठी सरकारची आयकर अधिनियम 1961 ची धारा 35-(1) (iii) च्या नियमानुसार शंभर टक्के आयकर सूट प्राप्त आहे. साधक याचा लाभ घेऊ शकतात. यासाठी बँकेची माहिती याप्रकारे आहे—

**विपश्यना विशोधन विन्यास,** ऍक्सिस बैंक लि., मालाड (प.)—

खाता क्र. 911010004132846; IFSC Code: UTIB0000062

**संपर्क-** 1. श्री डेरिक पेगाडो - 022-50427512/ 28451204
2. श्री बिपिन मेहता - 022-50427510/ 9920052156
3. ईमेल - audits@globalpagoda.org
4. वेबसाइट- https://www.vridhamma.org/donate-online

## विपश्यना पगोडा परिचालनार्थ "सेंचुरीज कॉर्पस फंड"

**'ग्लोबल विपश्यना पगोडा'चा** दैनंदिन खर्च सांभाळण्यासाठी पूज्य गुरुजींच्या निर्देशानुसार एका **'सेंचुरीज कॉर्पस फंडा'ची** व्यवस्था केली गेली आहे. त्यांची ही महत्वाची इच्छा पूर्ण करण्यासाठी **'ग्लोबल विपश्यना फाउंडेशन'** (GVF) ने हिशोब केला की जर 1,39,000 जणांनी, प्रत्येकाने रु. 9000/- जमा केले, तर १२५ कोटी रुपये जमतील आणि त्याच्या मासिक व्याजातून हा खर्च होऊ लागेल. जर कोणी एकदम एकत्र जमा करू शकत नसेल तर थोडी-थोडी सुद्धा जमा करू शकेल. *(काहींनी पैसे जमा केले आहेत आणि विश्वास आहे की लवकरच हे कार्य पूर्ण होईल.)*

साधक तसेच असाधक सर्व दात्यांना हजारो वर्षांपर्यंत आपली धर्मदानाची पारमी वाढविण्याची ही एक सुसंधी आहे. अधिक माहितीसाठी तसेच निधी पाठविण्यासाठी—

**संपर्कः**– 1. Mr. Derik Pegado, 9920447110. or
2. Sri Bipin Mehta, Mo. 9920052156,
A/c. Office: 022-50427512 / 50427510;
Email– audits@globalpagoda.org;
**Bank Details:** 'Global Vipassana Foundation' (GVF),
Axis Bank Ltd., Sonimur Apartments,
Timber Estate, Malad (W), Mumbai - 400064,
Branch- Malad (W).
Bank A/c No.- 911010032397802;
IFSC No.- UTIB0000062;
Swift code: AXIS-INBB062.
Online Donation- https://www.globalpagoda.org/donate-online

## ग्लोबल विपश्यना पगोडा, गोराई, मुंबई मध्ये

### एक दिवसीय महाशिबिर (Mega Course) कार्यक्रम:

(१) **रविवार – 17** जुलै, आषाढ पौर्णिमा (धम्मचक्कपवत्तन दिवस) तसेच

(२) **रविवार – 9** ऑक्टोंबर शरद पौर्णिमा तसेच पूज्य गुरुजींच्या पुण्यतिथी निमित्ताने महाशिबिरांचे आयोजन निर्धारित केले आहे.

**2. एक दिवसीय शिबिर दररोज**

या व्यतिरिक्त विपश्यना साधकांसाठी पगोडामध्ये दररोज एक दिवसीय शिबिरे आयोजित केली जात आहेत.

कृपया सामील होण्यासाठी लिंक चे अनुसरण करावे आणि एका मोठ्या समूहामध्ये ध्यान करण्याच्या अपार सुखाचा लाभ घ्यावा–**समग्गानं तपो सुखो !**

**संपर्कः 022 50427500 (Board Lines)** - Extn. no. 9,
मो. **+91 8291894644** (सकाळी 11 ते संध्याकाळी 5 वाजे पर्यंत).
(दररोज 11 ते 5 वाजेपर्यंत)

Online registration: http://oneday.globalpagoda.org/register Email: oneday@globalpagoda.org

**सूचना:** कृपया पाणी पिण्याची बाटली आपल्याबरोबर आणावी आणि पगोडा परिसरात पाणी भरून आपल्यासोबत ठेवावी.

**'धम्मालय' विश्राम गृहः** एक दिवसीय महाशिबिराला येण्यासाठी रात्रीच्या मुक्कामाकरीता **धम्मालयामध्ये** विश्रामाची सुविधा उपलब्ध आहे. अधिक माहिती आणि बुकिंग साठी संपर्क: 02250427599 or
email- info.dhmmalaya@globalpagoda.org
इतर कोणत्याही प्रकारच्या माहितीसाठी संपर्क:
info@globalpagoda.org or pr@globalpagoda.org

## दोहे धर्माचे

गुरुवर तुम्ही न भेटता, धर्म गंगा च तीर।
तर बस गंगा पूजितसे, कधी ना पितो नीर॥
संस्थापन रे धर्माचे, पाप उखडत च जाय।
सर्व कल्पना मान्यता, दूर होत रे जाय॥
असे ज्ञान च परोक्ष तर, गुंता वाढत जाय।
जाणल्या विन मान्यता, डोईतच रे जाय॥
कुशल कर्म करत राहा, कर पाप न लवलेश।
मन निर्मल करत राहा, हाच बुद्ध संदेश॥

## दोहे धर्माचे

गंगेमध्ये स्नान करी, केले चारीधाम।
मन तर व्याकुळच राही, सारे असे निकाम॥
अमृत रस तर वाहिला, शुद्ध धर्माचे सार।
राहिला फुटका मडके, डोईला रे भार॥
अंध भक्तीच्या पुष्टीने, दोष जागले अनेक।
ग्लानी आली धर्मावर, दूर राही विवेक॥
दंभ चढेच डोईवर, आंधळा तारणहार।
घेऊन आंधळा चेला, डुबला च मध्य धार॥

"विपश्यना विशोधन विन्यास" के लिए प्रकाशक, मुद्रक एवं संपादक: राम प्रताप यादव, धम्मगिरि, इगतपुरी- 422 403, दूरभाष :(02553) 244086, 244076.
मुद्रण स्थान : अपोलो प्रिंटिंग प्रेस, 259, सीकाफ लिमिटेड, 69 एम. आय. डी. सी, सातपुर, नाशिक-422 007. बुद्धवर्ष 2566, आषाढ पौर्णिमा, 13 जुलै 2022

वार्षिक शुल्क रु. 100/-, US $ 50, (भारताबाहेर पाठविण्यासाठी) रजि. नं. MAHMAR/2017/72685. Postal Regi. No. NSK/286/2021-2023

Posting day- **Purnima of Every Month,** Posted at **Igatpuri-422 403,** Dist. Nashik (M.S.) **(किरकोळ विक्री होत नाही)**
**DATE OF PRINTING: 1 JULY, 2022 DATE OF PUBLICATION: 13 JULY, 2022**

If not delivered please return to:-
**विपश्यना विशोधन विन्यास**
**धम्मगिरि, इगतपुरी - 422 403**
**जिला-नाशिक, महाराष्ट्र, भारत**
**फोन : (02553) 244076, 244086,**
**244144, 244440.**
Email: vri_admin@vridhamma.org;
Course Booking: info.giri@vridhamma.org
Website: www.vridhamma.org